ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाविलास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख १७ आक्टोबर, १९५१ अंक ४२

## विविध माहिती

**लोकसंख्येच्या अभ्यासासाठी देणगी**—अन्नमलाय विद्यापीठांत लोकसंख्येचा अभ्यास करणारी एक संस्था आहे. ह्या संस्थेस अमेरिकेमधील रॉकफेलर फौंडेशननें १०,००० रुपये किंमतीचीं उपयुक्त पुस्तकें बक्षिस दिलीं आहेत. देणगीसाठी विनंति संस्थेचे डायरेक्टर श्री. चंद्रशेखरन् ह्यांनीं केली होती. सदर संस्था आतां बडोदे विद्यापीठांत समाविष्ट करण्यांत आली आहे.

**किर्लोस्कर इलेक्ट्रिक कंपनी लि.**—ह्या कंपनीला ३० जून, १९५१ अखेर पुऱ्या झालेल्या वर्षांत २०,२७१ रुपये नफा झाला; गेल्या वर्षी कंपनीला ३५,७८७ रुपये तोटा झाला होता. १९४९–५० व ५०–५१ सालासाठी सुमारे २·१ लाख रुपये घसारा काढून ठेवल्यावर मग वरील नफा जाहीर करण्यांत आला आहे. कंपनीच्या कारखान्यांत आतां १ अश्वशक्तीपासून १०० अश्वशक्तीपर्यंतच्या विविध प्रकारच्या मोटर्स तयार होऊं शकतात.

**सुसरींचा तुटवडा**—आफ्रिकेमधील व्हिक्टोरिआ सरोवरांतील सुसरींची शिकार करण्याचा व्यवसाय गेलीं दोन वर्षें चांगला भरभराटला होता. परंतु आतां सुसरींचा तुटवडा पडूं लागला आहे. सुसरींना चांगली किंमत आल्यामुळें शिकाऱ्यांनीं त्यांची पारध मोठ्या प्रमाणावर केल्यानें आतां त्या दुर्मिळ होऊं लागल्या आहेत. कांहीं वर्षांपूर्वी ह्या सरोवरांत सुसरींचे थवेच्या थवे दृष्टीस पडत असत.

**सीलोनमध्यें जागतिक बँकेचे प्रतिनिधी**— इंटर नॅशनल बँकेचें एक प्रतिनिधि–मंडळ सीलोनमध्यें आलें आहे. सीलोनच्या आर्थिक विकासाची शक्यता अजमावणें आणि पुनर्घटनेची दूर-गामी योजना सुचविणें, असा मंडळाचा हेतु आहे. ह्या प्रतिनिधि मंडळांत निरनिराळ्या आठ राष्ट्रांचे प्रतिनिधी असून ते आप-आपल्या विषयांत तज्ज्ञ असे आहेत. मंडळ सुमारें दोन महिने पर्यंत सीलोनमध्यें दौरा काढणार आहे.

**जपानमध्यें तयार झालेल्या अमेरिकन मोटारी**—अमेरिकेनें जपानमध्यें कारखाने काढल्याची वार्ता आली आहे. जपानी कारखान्यांतून तयार झालेल्या परंतु अमेरिकन बनावटीच्या कांहीं मोटारी नुकत्याच फिलिपाइन्सला एका स्वीडिश बोटींतून पाठविण्यांत आल्या.

### "अर्था"चा दिवाळी अंक

ता. ३१ ऑक्टोबर, १९५१ रोजीं प्रसिद्ध होईल. ज्यांनीं अद्याप जाहिराती पाठविल्या नसतील, त्यांनीं त्या त्वरेनें पाठवाव्या.

ता. २४ ऑक्टोबर, १९५१ चा अंक बंद राहील.

**अमेरिकेंतील कागदाचें उत्पादन**—अमेरिकेच्या वृत्तपत्राच्या कागदाच्या उत्पादनांत १९५० सालीं वाढच होत राहिली. ह्या सालीं एकूण १० १३,३४५ टन कागद तयार झाला. १९४८ सालीं कागदाचें उत्पादन ८,७५,७६० टन आणि १९४९ सालीं ९,१७,७७८ टन इतकें झालें होतें.

**तेलासाठी शोध**—प. बंगाल, आसाम आणि त्रिपुरा ह्या भागांत तेल शोधण्यासाठी स्टँडर्ड–व्हॅक्यूम ऑईल कंपनीनें प्रयत्न चालविले आहेत. हा शोध विमानांतून करण्यांत येणार असून त्यासाठी ' मॅग्नेटोमीटर ' नांवाचें आधुनिक यंत्र वापरण्यांत येणार आहे. ह्या यंत्राच्या साह्यानें भूगर्भांतील खनिजांचा तपास लावणें सुलभ होतें. अशा प्रकारचा प्रयत्न भारतांत पहिल्यानेंच करण्यांत येत आहे.

**भांडारकर संशोधन संस्थेला देणगी**—पुणें येथील भांडारकर–संशोधन संस्थेला लंडनच्या ब्रिटिश ॲकडेमीनें ४० हजार रुपयांची देणगी दिली आहे. देणगीचा उपयोग महाभारताची संशोधित आवृत्ति प्रकाशित करण्यासाठीं व्हावयाचा आहे. संस्थेनें महाभारताच्या संशोधनाचें कार्य गेलीं १२ वर्षें केलेलें असून त्या कामीं सुमारें ८॥ लाख रुपये खर्च केले आहेत. संशोधनाचें अर्धें-अधिक काम झालें आहे.

**जाहिरात प्रसिद्ध करण्याचें नाकारलें**—इराणच्या तेलाबाबत पर्शिअन सरकारशीं व्यवहार करण्याविरुद्ध अँग्लो–इराणिअन ऑइल कंपनीनें तेलवाहू जहाजांच्या मालकांना, ब्रोकर्सना आणि तेल कंपन्यांना इषारा दिला होता. परंतु ह्या इषाऱ्या-संबंधींच्या जाहिराती प्रसिद्ध करण्याचें ' डॉन ' व ' सिव्हिल अँड मिलिटरी गॅझेट ' ह्या पाकिस्तानांतील वृत्तपत्रांनीं नाकारलें. त्यानंतर जाहिरातदारांनीं कोठल्याच वृत्तपत्राला सदर जाहिरात द्यावयाची नाहीं, असें ठरविलें.

**नेपाळमध्यें कोळशाच्या खाणी**— नेपाळमधील डांगच्या खोऱ्यांत दगडी कोळसा सांपडल्याची बातमी आहे. ह्या कोळशांत गंधक, लोखंड व इतर खनिजें मिश्रित झालेलीं असल्यामुळें तो शुद्ध करून मगच वापरावा लागेल. एकूण तीन थर सांपडले असून त्यांतून सुमारें १-२ कोटी टन कोळसा निघूं शकेल असा अंदाज आहे.

### लवादप्रकरणांचे निकाल : खात्यास सूचना

संपादक " अर्थ " ह्यांस न. वि.

लवादासाठी दाखल झालेलीं प्रकरणें वेळचे वेळीं निकालीं निघत आहेतना, हें पहाण्यास सोपें व्हावें म्हणून या प्रकरणांची माहिती देणारें एक रजिस्टर मा. असि. रजिस्ट्रार यांच्या कचेऱ्यांत ठेवण्यांत आलेलें असतें असा माझा समज आहे. हीं प्रकरणें वेळचेवेळीं निकालीं न निघतां अनेक वर्षें बाजूस पडून रहतील तर लवादासंबंधीं लोकांत दरारा अगर विश्वास न वाटतां तो विषय थट्टेचा होऊन बसतो असें मला वाटतें. यासाठी माझी सहकारी खात्याच्या विचारासाठीं अशी सूचना आहे कीं, अशा पडून राहिलेल्या प्रकरणांची माहिती देणारा एक तक्ता असि. रजि. यांच्या वार्षिक रिपोर्टांत नमूद असावा व जीं प्रकरणें एक वर्षांचेवर लवादांकडे निकालीं न निघतां पडून राहिलीं असतील तीं प्रकरणें दुसऱ्या लवादाकडे वर्ग कां होऊं नयेत यासंबंधीं असि. रजि. यांनीं आपले शेरे प्रत्येक प्रकरणासंबंधी वेगवेगळे दाखल करावेत. अशी प्रथा सुरू करावी, एवढेंच नव्हें तर तीन वर्षांवर पडून राहिलेल्या प्रकरणांचा एक तक्ता सहकारी चळवळीच्या वार्षिक अहवालांत नमूद असावा. तसेंच रद्द झालेल्या सोसायट्यांचे सर्व हिशेब पुरे होऊन ज्या सोसायट्यांचे नोंदणीचें सर्टिफिकेट, लिक्विडेशनचे हुकुमानंतर १२ वर्षांपेक्षां जास्त काळ झाला असूनही रद्द झालें नसेल त्यांचा एक तक्ता देण्यांत यावा, असें मला वाटतें. लवादाबद्दल समाजांत आदर निर्माण व्हावा असें वाटत असल्यास लवादप्रकरणांचा निकाल सत्वर होणें फार अगत्याचें आहे.

" बिन-सरकारी सहकारी "

---

### संयुक्त प्रांतांतील हिंवताप विरोधी मोहीम

संयुक्त प्रांत सरकारनें आपल्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ग्रामीण भागांतील हिंवतापाविरुद्ध मोहीम काढण्याला प्राधान्य दिलें आहे. राज्यांत सुमारें ४०,००० ग्रामपंचायती आहेत, त्यांना सरकारकडून जंतुघ्न द्रव्यें, तीं उडविण्याचें साहित्य, वगैरे पुरविण्यांत येणार आहे पुढेंमागें ह्या ग्रामसंस्था आपआपलीं उपकरणें विकत घेऊं शकतील, अशी सरकारला आशा वाटते. राज्याच्या पूर्व भागांत हिंवताप विरोधी चार तुकड्या काम करणार आहेत. ह्या भागांतील खेड्यांना ५ वर्षेंपर्यंत डी. डी. टी. फुकट पुरविण्यांत येणार आहे. त्यानंतर त्यांनीं ते विकत घ्यावयाचें आहे. सध्या राज्यांत दोनशें प्रसूतिकेंद्रें काम करीत आहेत. एम्प्लॉयिज स्टेट इन्शुरन्स योजनेप्रमाणें कानपूर शहरांत २०० दवाखाने उघडण्यांत येणार आहेत.

---

### अमेरिकेंतील वैवाहिक जीवन

अमेरिकेंत विवाहित स्त्रियांची संख्या ३,८०,००,००० इतकी आहे. त्यांपैकीं दोन पंचमांश स्त्रियांचें वय ३५ चे खालीं आहे. फक्त एक दशमांश स्त्रिया ५५ चे पुढें आहेत. सरासरीनें पहातां, चारापैकीं तीन कुटुंबांत पतीपेक्षां पत्नी वयानें लहान असते. आठांपैकीं एका कुटुंबांत पत्नीचें वय जास्त असतें आणि बाकीच्या कुटुंबांत दोघांचेंहि वय साधारण सारखेंच असतें. पुनर्विवाहितांची संख्या गेल्या कांहीं वर्षांत वाढली आहे. विवाहित आठ स्त्रियांपैकीं एकीचा पहिला विवाह आधीं होऊन गेलेला असतो. प्रत्येक सहा कुटुंबांपैकीं एकांत तरी पति किंवा पत्नी ह्यांपैकीं कोणास तरी पूर्वीच्या एकाद्या तरी विवाहाचा अनुभव असतो.

---


**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वीं आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay

दि

**युनायटेड कमर्शिअल बँक लि.**

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ६० लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद-गोएंका<br>व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या<br>व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सींच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १७ आक्टोबर, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## शेअर बाजारांतील व्यवहारांचें नियमन

### गोरवाला समितीच्या शिफारशी

भारत सरकारनें २३ जून, १९५१ रोजीं श्री. ए. डी. गोरवाला यांच्या अध्यक्षतेखालीं शेअर बाजारांचें नियमन करण्यासाठी सूचना करण्याकरितां एक समिति नेमली होती. शेअर बाजारांवरील नियमनाबाबत भारत सरकारच्या कच्च्या सूचनांवर विचारविनिमय करून एक अहवाल तयार करण्याचें आणि या विषयावर विधिमंडळांत येणाऱ्या बिलाचा सुधारलेला मसुदा तयार करण्याचें काम या समितीकडे देण्यांत आलें होतें. समितीचा अहवाल अर्थमंत्री, श्री. देशमुख, ह्यांनीं ता. ६ रोजीं संसदेस सादर केला.

शेअर बाजार आपापल्या क्षेत्रांत कायद्याच्या कक्षेंत राहून उपयुक्त कामगिरी करीत असतात, ही गोष्ट मान्य करून जनहिताचे दृष्टीनें या कार्यांचें योग्य प्रकारें नियमन व्हावें यावर समितीनें भर दिला आहे. हें नियमन बाह्य व अंतर्गत दोन्ही स्वरूपाचें असावें. बाहेरील नियमनांसाठी शेअर बाजारावर मोठ्या प्रमाणावर सरकारी नियंत्रण व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी योग्य ती यंत्रणा असावी, तर आंतील नियमनासाठी योग्य असे पोट नियम आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठी शेअर बाजाराच्या कक्षेंत बसेल अशा यंत्रणेची व्यवस्था करण्यांत यावी, असें समितीनें सुचविलें आहे.

शेअर बाजारांतील वायदेबाजीवर नियंत्रण, ही या नियमनांतील मुख्य गोष्ट असून हें नियंत्रण योग्य कक्षा, योग्य माणसें व योग्य प्रकारच्या कामासाठी त्याचा उपयोग करणें, ही त्याची कसोटी आहे. वायदेबाजीनें बाजारावर अहितकारक परिणाम होऊं नये याकरितां ती मर्यादित व माहितीपूर्वक केलेली असावी. या अहवालांत पुढें म्हटलें आहे, "वायदेबाजी करणारा माहितगार पाहिजे. आपल्या मताच्या पाठपुराव्यासाठीं आवश्यक तेवढा पैसा त्याचेकडे असणें आवश्यक आहे, कारण त्याचें कामच बाजारांतील देवघेवी चालू ठेवण्याचें असतें. या धंद्यांतील माहिती नसलेला, परंतु पैसेवाला इसम वायदेबाजी करूं लागल्यास तो केवळ जुगारी होईल आणि तो स्वतःसच खड्ड्यांत घालील. तसेंच भरपूर पैसा नसलेला पण ज्ञान असलेला वायदेबाजी करूं लागल्यास, तो दिवाळखोरीच्या मार्गावर जाण्याची शक्यता असते. त्याचेमुळें बाजारपेठेस धोका येतो. पैसा व माहिती दोन्ही असलेला इसम कायद्याच्या कक्षेंतील वायदेबाजीबाहेर जाऊं लागल्यास त्याच्यापासून बाजारपेठेस तो भांडवल गुंतविणारास व एकूण जनतेस धोक्यांत आणतो. पैसा नाहीं व ज्ञानही नाहीं असा इसम वायदेबाजी करूं लागल्यास तो दुसऱ्यास धोकादायक होतो, इतकेंच नव्हे तर तो धंदा करण्यासही नालायक ठरतो."

या करितां कडक नियंत्रणाची आवश्यकता आहे आणि याच विचारानें शेअर बाजाराबाहेरील वायदेबाजी बेकायदेशीर ठरवून ती सर्वस्वी नाहीशी करण्यांत यावी आणि शेअर बाजारांतील व्यवहार त्याच्या नियमांनुसार करावा व अधिक महत्त्वाच्या नियमांचा भंग करून झालेले वायदेकरार रद्द करण्यांत यावेत अशी शिफारस समितीनें केली आहे. तसेंच परिणामकारक नियंत्रणासाठीं एका विभागांत एकच शेअर बाजार असावा या गोष्टीस मान्यता देण्यावर समितीनें भर दिला आहे. अशा बाजारास रोख्यांच्या व्यवहाराचा मक्ताच मिळत असल्यानें कार्यक्षमता, सचोटी व आर्थिक कुवतीचे बाबतींत सभासदांसाठी कांहीं प्रमाणें ठरविण्यांत आलीं पाहिजेत.

सर्व सरकारमान्य शेअर बाजारांचे नियम व उपनियम दुरुस्त करण्याचे, त्यांचे बोर्डावर अधिकारी नेमण्याचे आणि कांहीं बाबतींत कार्यकारी मंडळ बाजूला सारून बोर्डाच्या सर्व सदस्यांची नेमणूक करण्याचे किंवा मान्यता काढून घेण्याचे अधिकार सरकारला पाहिजेत, असें समितीचें मत आहे. सरकारला या अधिकारांचे बाबतींत सल्ला देण्यासाठी एक शेअर बाजार कमिशन नेमावें आणि त्यावर शेअर बाजाराची पूर्ण माहिती व अनुभव असणारे तीनपर्यंत सदस्य असावेत; एकसूत्री धोरण आंखण्याच्या दृष्टीनें आवश्यक तेवढे सोडून बाकी अधिकार राज्य सरकारांचे हातीं सोपवावेत, असेंहि समितीनें सुचविलें आहे.

शेअर बाजाराच्या अंतर्गत कारभाराविषयीं समितीनें असें सुचविलें आहे कीं प्रत्येक शेअर बाजाराचा एक विनिमय विभाग (क्लिअरिंग हाउस) असावा आणि तेथून सर्व रोख्यांचा विनिमय (क्लिअरन्स) व्हावा. सरकारमान्य शेअर बाजाराच्या उपनियमांत, 'डिफॉल्ट' झाल्यास विक्रीची किंवा खरेदीची तरतूद, किमान कमिशनची अंमलबजावणी, पंधरवड्याहून कमी काळांत सेटलमेंटस आणि तांतडीच्या प्रसंगीं उपयोगांत आणण्यासाठी खास अधिकार यांची तरतूद असावी. शेअर बाजार उघडा असणाऱ्या सध्यांच्या वेळा वाढवाव्यात आणि बाजाराबाहेर व्यवहार करण्याची वृत्ति नाहींशी करण्यासाठी सुटीच्या दिवसांच संख्या कमी करावी. 'स्पॉट कॉण्ट्रॅक्टस्' खेरीज बाकीचे सर्व व्यवहार नियमनाच्या कक्षेंत आणण्यांत यावेत आणि तेही सरकारमान्य शेअर बाजारामार्फत होऊं शकावेत, अशी शिफारस समितीनें केली आहे. यामुळें पैसे गुंतविणाऱ्यांना व जनतेस त्रास होईल, असें समितीला वाटत नाहीं.

नियमनाच्या दृष्टीनें शेअर बाजाराच्या यादीवरील (लिस्टेड) आणि इतर (नॉन लिस्टेड) रोख्यांत फरक करणें हिताचें आहे असें समितीला वाटत नाहीं. कारण असें सर्वव्यापी नियंत्रण ठेवलें नाहीं तर अनियंत्रित रोख्यांचे बाबतींत असे बरेच गैरकायदेशीर शेअर बाजार निर्माण होतील आणि यादीवरील कांहीं रोख्यांवरील नियंत्रणानें जें कांहीं हित साधणार असेल तें नाहींसें होईल. परंतु सरकारमान्य शेअर बाजारांत, असे यादींतील व इतर रोखे असतीलच. बरीच उलाढाल होणारे रोखे यादींत समाविष्ट व्हावेत म्हणून समितीनें अशी सूचना केली आहे कीं, असे रोखे काढणाऱ्या कोणत्याहि कंपनीस एखाद्या सरकारमान्य शेअर बाजाराच्या यादींत ते समाविष्ट करण्यास भाग

पाहण्याची सरकारला सत्ता असावी. यासेरीज तरावणी व्यवहार, आशिलांना पत्ताही नसतां त्यांचे वतीनें 'प्रिन्सिपाल्स' म्हणून वागणारे दलाल, यासारख्या गोष्टींवर निर्बंध ठेवण्याची समितीनें सूचना केली आहे. त्याचप्रमाणें, बदला सवलतीचा गैरउपयोग शेअर बाजार अधिकाऱ्यांनीं करूं देऊं नये, अशीहि शिफारस केली आहे.

वरील शिफारशीचें बाबतींत समितीचें एकमत असलें तरी ब्लँक ट्रॅन्स्फर्स चालू ठेवणें, त्यांवर बंधनें ठेवणें किंवा रद्द करणें याबाबतींत एकमत होऊं शकलें नाहीं. शेअर बाजाराशीं संबंध असलेले कमिटीचे सभासद आणि इतर दोघे यांच्यामतें असे व्यवहार हा व्यापाराची एक महत्त्वाची उलाढाल असून त्याचे कांहीं फायदे आहेत, आणि म्हणून ते व्यवहार चालू ठेवावेत असें आहे, तर इतर तिघांच्या मतें अशा कोण्या रोल्यांची मुदत सहा महिनेच असावी आणि हें बंधन सरकारमान्य शेअर बाजाराच्या नियमान्वयें करण्यांत यावें; कायदे करून कप्पर्यांत येऊं नये असें आहे. बाकीचे सदस्य व अध्यक्ष यांचे मतेंही ही पद्धति बंद करावी असेंच आहे. परंतु तडजोड म्हणून अशा व्यवहारांची मुदत सहा महिनेपर्यंतच असावी, मात्र हें बंधन कायदेशीर तरतुदीनें व्हावें यावर त्यांचें एकमत आहे. मात्र, ब्लँक ट्रॅन्स्फर्सचा प्रसार कमी व्हावा म्हणून कंपनीनें त्या शेअरवर जाहीर केलेला नफा रजिस्टर्ड होल्डरलाच मिळावा अशी कायदेशीर तरतूद करण्याची शिफारस समितीनें एकमतानें केली आहे.

योग्य असे कायदे व नियम असले तरी त्यांचें पालन केलें जात नाहीं, असा शेअर बाजारांतील अनुभव आहे. अनिष्ट प्रवृतीस योग्य वेळींच पायबंद घालणें आवश्यक असतें, ह्या दृष्टीनें कमिटीच्या शिफारशी अर्थात स्वागतार्ह आहेत.

## प्राप्तीकराच्या रिफंडची मागणी

### अर्जदारांकरतां माहिती पुस्तिका

कर भरणाऱ्यांनीं प्राप्तीकराच्या रिफंडची मागणी व तें प्रकरण थोडक्या वेळांत निकालांत काढतां यावें याकरतां कोणती पद्धति उपयोगांत आणावी याबद्दल समग्र माहिती एका पुस्तिकेंत सोप्या व नेहमींच्या भाषेंत मांडली असून प्राप्तीकर अधिकाऱ्याकडे ती मिळूं शकेल. विविध तऱ्हेनें मिळणाऱ्या उत्पन्नांचा प्राप्तीकर कायद्यांत विचार केला असल्या कारणांनें तो गुंतागुंतीचा असणें साहजिक आहे. परंतु कांहीं विशिष्ट अटींनुसार कांहीं विशिष्ट प्रकरणांत कराच्या सुटीचीही तरतूद केलेली आहे. अशीं सूट निरनिराळ्या अनेक गोष्टींवर ठरविण्यांत येत, असून त्यांची पूर्तता झाल्यास रकम परत मिळते. वरील पुस्तिकेंत निरनिराळ्या प्रकारच्या उत्पन्नाबाबत रिफंडची मागणी करण्यासाठीं कोणकोणत्या वेगवेगळ्या पद्धती आहेत तें दिलें असून, कोणत्या प्रकरणांत सूट मिळूं शकते, अशा प्रकारचे अर्ज नेमक्या कोणत्या अधिकाऱ्याकडे करावेत, मर्यादेची मुदत आणि इतर अनुषंगिक माहितीहि देण्यांत आली आहे.

रिफंडची मागणी बरोबर आहे हें सिद्ध करण्याची जबाबदारी अर्जदारावर आहे, कारण कर भरणाऱ्या वर्गाचे विश्वस्त या नात्यानें सरकार काम पहात असल्यानें पैसे परत करण्यापूर्वी अशी मागणी बरोबर आहे अशी सरकारची खात्री झाली पाहिजे. रिफंडच्या निरनिराळ्या स्वरूपाच्या मागणीसाठी अर्जदारांनीं स्वीकारणीय पुरावे कोणत्या पद्धतीनें सादर करावेत यासंबंधीं समग्र विवेचन वरील माहिती पुस्तिकेंत करण्यांत आलें आहे.

## भारतांतील नागरी विमानवाहतुकीची प्रगति

३० जून, १९५१ रोजीं संपलेल्या सहामाहींत भारतांतील नागरी विमानवाहतुकींत समाधानकारक प्रगति दिसून आली.

या काळांत ८ भारतीय विमान कंपन्या नियमितपणें २६,२०५ मैलांच्या मार्गावर वाहतूक करीत होत्या. ३० जून, १९५० ला हा मार्ग २३,०६२ मैलांचा होता. जानेवारी ते जून १९५१ या काळांत भारतीय विमान कंपन्यांनीं ९३,८१,९४६ मैल प्रवास करून २,२९,३२६ उतारू, १६,२०० टन माल ९८० टन वृत्तपत्रें आणि १,५०० टन टपाल वाहून नेलें.

अहवालाच्या काळांत, १८,०१६ उतारूंनीं रात्रींच्या विमानवाहतुकीनें प्रवास केला. या वाहतुकीनें ५,१२,६०० पौंड माल व १२,२१,६६२ पौंड टपाल वाहून नेलें. १९५० चे याच कालावधींचे आंकडे अनुक्रमें १४,८३० उतारू, ३,०४,२३४ पौंड माल व ११, ६१, ०८८ पौंड टपाल असे होते. दुसऱ्या सहामाहींतील आंकडे १५,८६७ उतारू ६,६२,१८२ पौंड माल, १२,२०,०३९ पौंड टपाल असे होते.

याच काळांत १७ कंपन्यांना 'नॉन–शेड्यूल्ड' विमान वाहतुकीचे परवाने होते. त्यांनीं ३,००,००० मैल प्रवास केला आणि ३६,५६० उतारू, ३२,००९ टन माल वाहून नेला. गतवर्षीचे हेच आंकडे अनुक्रमें ३१,०६७ उतारू व २०,५८५ टन माल असे होते.

### नवे विमानमार्ग

एअर सर्व्हिसेस ऑफ इंडिया लि. नें, एप्रिलमध्यें मुंबई–बेळगांव–कोचीन मार्गावर आठवड्यांतून तीन दिवस आणि भारत एअरवेजनें मे महिन्यापासून गौहत्ती–कुंभीग्राम मार्गावर आठवड्यांतून दोनदां वाहतूक सुरू केली. हिमालयन एव्हिएशन लि. व डेकन एअरवेज लि. यांना त्यांचे मार्गावर वाहतूक करण्याचे परवाने १ जूनपासून आणखी एक वर्षभर देण्यांत आले.

यासेरीज भारत एअरवेज लि. ला कलकत्ता रंगून बँकॉक–हाँगकॉंग मार्गावर आणि एअरवेज (इंडिया) लि. ला गौहत्ती–बागडोग्रा–पाटणा–कानपूर–आग्रा–दिल्ली मार्गावर वाहतुकीसाठीं सहा महिने मुदतीचे परवाने देण्यांत आले. स्कँडिनेव्हियन एअर लाइन्स आणि नॉर्वेजियन कंपन्यांना भारतावरून जाण्यायेण्याची दिलेली तात्पुरती परवानगी आणखी सहा महिन्यांनीं वाढविण्यांत आली.

विमान वाहतूक कंपन्या आणि फ्लाइंग क्लब यांना भारतांत आणि भारत व पाकिस्तानमध्यें केलेल्या उड्डाणाकरितां लागलेल्या पेट्रोलवर दर गॅलनला ९ आणे या दरानें देण्यांत येणारी सरकारी मदत ३१ मार्चपर्यंत चालू होती. १९५१–५२ बाबतचा नवीन निर्णय ठरेतोंपर्यंत दर गॅलनमागें ६ आणे मदत देण्याचें सरकारनें ठरविलें.

### ७५ विमानतळ

मुझफरपूर, रांची व कोटा येथें नवे विमानतळ सुरू करण्यांत आले असून एकूण विमानतळांची संख्या आतां ७५ झाली आहे. असनसोल, रांची व मुझफरपूर येथें वैमानिक दळणवळण केंद्रें स्थापन करण्यांत आलीं असून अशा केंद्रांची संख्या आतां ५४ झाली आहे. यासेरीज बालुरघाट, कोटा व इंफाल येथें अशा केंद्रांसाठी पूर्व तयारी चालू आहे.

## युद्ध–तयारीसाठी चालू असलेले ब्रिटनचे प्रयत्न

एका वर्षापूर्वी ॲटली यांनीं तीन वर्षांचा ३६० कोटी पौंड खर्चीं पडणारा युद्ध–तयारीचा कार्यक्रम जाहीर केला. सुधारलेल्या अंदाजाप्रमाणें ४७० कोटी पौंड खर्च होणार आहे. सध्यां वार्षिक राष्ट्रीय उत्पन्नाचा १२ टक्के भाग युद्ध–तयारीसाठी खर्च होत आहे. योजना आखणें सोपें असतें, परंतु खर्च कसा करावयाचा हा मुख्य प्रश्न असतो. लष्करी साहित्यासाठी १०० कोटी पौंडांची ऑर्डर देण्यांत आली आहे. साहित्यासाठी कराव्या लागणाऱ्या एकंदर खर्चांपैकी हा खर्च निम्मा आहे युद्ध–तयारासाठी कराव्या लागणाऱ्या खर्चापैकी निम्म्याहून जास्त खर्च अन्न-वहातूक, इमारती व पगार या गोष्टींवर करावा लागतो. सशस्त्र फौजेची संख्या जून १९५० मध्यें ६ लक्ष, ९० हजार होती. परंतु, आतां ती ८ लक्ष २७ हजार झाली आहे. १९३९ च्या संख्येच्या मानानें ही संख्या दुप्पट आहे. लौकरच ही संख्या ९ लक्षांपर्यंत नेण्यात यईल. ब्रिटनमध्यें सध्यां जवळजवळ बेकारी नाहीं. यामुळें सैन्यांतील संख्या वाढवावयाची म्हणजे उद्योगधंद्यांत व इतर व्यवसायांत काम करणारांची संख्या कमी करावी लागेल.

युद्ध–प्रयत्न व त्यासाठीं लागणाऱ्या कच्च्या मालाच्या वाढत्या किंमती याचा ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेवर विशेष ताण पडत आहे. युद्ध–खर्चाला विरोध करणारे अगदीं थोडे लोक आहेत. युद्धतयारीसाठीं लागणारें औद्योगिक उत्पादन समाधानकारक आहे ही गोष्ट, इतर अडचणींना तोंड द्यावें लागत असतांहि, ब्रिटनच्या औद्योगिक कार्यक्षमतेची निदर्शक आहे. कच्च्या मालाच्या पुरवठ्याची एका वेळीं विशेष काळजी वाटत होती. परंतु १९५१ च्या सुरवातीच्या मानानें गंधक, कांहीं धातु, लोकर, कापूस या बाबतींतली पुरवठ्याची स्थिति जरा सुधारली आहे. परंतु स्क्रॅप व पिग आयर्न यांच्या कमतरतेमुळें पोलादाच्या उत्पादनाची परिस्थिति चिंतनीय बनली आहे. त्याचप्रमाणें कोळशाचाहि तुटवडा जाणवत आहे. परंतु आजपर्यंतच्या अनुभवावरून अशी आशा करावयास हरकत नाहीं कीं, ब्रिटन याहि संकटाला तोंड देऊं शकेल, व मुलकी कारखान्यांचें, युद्ध–विषयक साहित्य बनविणाऱ्या कारखान्यांत सहज रूपांतर करतां येईल. याप्रमाणें युद्धप्रयत्नांच्या किंवा तयारीच्या बाबतींत उत्पादनाचा प्रश्न आटोक्यांत आलेला आहे. परंतु पैसा उभारण्याचा प्रश्न विशेष बिकट झाला आहे. परराष्ट्रीय व्यापारांतील प्रतिकूल तफावतीमुळें त्यांत भर पडली आहे. गेल्या वर्षी २३ कोटी पौंडांची परराष्ट्रीय व्यापारांत अनुकूल तफावत उरली होती. यंदा अशी अनुकूल तफावत उरली नाहीं तरी व्यापार समतोल होईल अशी अपेक्षा होती. परंतु युद्धतयारीच्या वाढत्या खर्चामुळें २३ कोटी पौंडाहूनहि जास्त प्रतिकूल तफावत येईल.

ब्रिटनची आयात अलिकडे जास्त खर्चाची झाली आहे. परंतु निर्गत मालाच्या किंमती कमी पातळीवर असल्यामुळें निर्गतीमुळें ब्रिटनला व्हावा तितका फायदा होत नाहीं हें आजच्या बिकट परिस्थितीचें मुख्य कारण आहे. अगदीं थोड्या दिवसांपूर्वीपासून आयात मालाच्या किंमती किंचित् उतरूं लागल्या आहेत व निर्गत मालाच्या किंमती अल्प प्रमाणांत वाढूं लागल्या आहेत. परंतु ही परिस्थिति टिकून राहिली तरी त्यामुळें परराष्ट्रीय व्यापारी–देण्याबद्दलची परिस्थिति विशेष सुधारेल असें नाहीं. आयातीमध्यें कपात करून व निर्गतींत वाढ करूनच ही गोष्ट साध्य होईल.


दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल
को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
९ बँक हाऊस लेन, कोट, मुंबई,
स्थापन साल १९११

चेअरमनः–श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| मागीतलें भांडवल | रु. ४८,२६,००० |
| गंगाजळी फंड | रु. ३३,४१,००० |
| ठेवी | रु. ८,६९,९७,००० |
| खेळतें भांडवल | रु. १०,४३,९३,००० |

१५ जिल्ह्यांत ६५ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

दी भारत इंडस्ट्रिअल
बँक लिमिटेड
हेड ऑफिस : पुणें शहर
शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक)
पे-ऑफिसः—खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) | श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ३,९९,३८५ |

एकूण खेळतें भांडवल ६३ लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर.

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक लि.
( शिडयूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

अधिकृत, विक्रीस काढलेलें
व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,१९,४८५
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.
श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर.

॥ श्री ॥
दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट
लिमिटेड, पुणें २.

ठेवीवर १ वर्षाला ६ टक्के व्याज दिलें
म्हणून
ठेवी मिळून कार्य लवकर यशस्वी झालें.

मिल हाऊस, पॉवर हाऊस, बॉयलर
—: ट्रायल घेतली A 1 :—

नवीन मशिनरीनें
दिपवाळीनंतर साखर करण्यास सुरुवात

येत्या हंगामापासून साखरेच्या उत्पादनांतील वाढीनें
[ १ ] मुदतीप्रमाणें ठेवी परत करतां येतील.
[ २ ] शेअरचा १० टक्के नफा कायम ठेवतां येईल.

★ शेअर–विक्री सुरू आहे ★

शेअर व ठेवीचे फॉर्म कंपनीच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

★ ठेवीची मुदत १ वर्ष : व्याज ६ टक्के ★

कॉमनवेल्थ बिल्डिंग, ९८०
सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणें २.
दि. ९ सप्टेंबर १९५१.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.,
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.

## मजूर पक्षाचा निवडणुकीचा जाहीरनामा

निवडणुकीच्या जाहीरनाम्यांत ब्रिटनमधील मजूर पक्षानें असें म्हटलें आहे कीं शांतता राखणें, सर्वांना नोकऱ्या देणें, उत्पादन वाढविणें, राहाणीचा खर्च उतरविणें व समाजांत सर्वांना सारखा न्याय साधणें हें आपलें ध्येय राहील. तिसरें महायुद्ध टळण्यासारखें आहे. शांतता केवळ शस्त्रास्त्रांनीं साध्य होत नाहीं, तर शांतता साधण्यासाठीं दारिद्र व भूक यांपासून सर्व ठिकाणच्या जनतेचें रक्षण केलें पाहिजे. मजूर पक्ष अशा प्रकारचें धोरण इतर देशांचे बाबतींत ठेवीत आहे. ब्रिटनमध्ये शांततेच्या सहा वर्षांत मजूर पक्षानें सर्वांना नोकऱ्या दिल्या आहेत ही विशेष गोष्ट आहे. कारण असें पूर्वी कधींहि घडलें नव्हतें. उलट, आज ब्रिटनमध्यें पांच लक्ष जागा रिकाम्या असून त्यासाठीं माणसें पाहिजे आहेत. युद्ध-पूर्वीच्या मानानें शेतीचें व उद्योगधंद्यांचें उत्पन्न ५० टक्के वाढलें आहे. शेती मालाला निश्चित किंमतीचें आश्वासन दिलें जाईल. राष्ट्रीयीकरणानंतर युरोपांतील कोणत्याहि देशापेक्षां किंवा अमेरिकेपेक्षां कोळशाची किंमत ब्रिटनमध्यें कमी झाली आहे. कच्च्या मालाच्या योग्य विभागणीसाठीं व त्याच्या किंमती स्थिर राखण्यासाठीं आंतरराष्ट्रीय पातळीवरून प्रयत्न केले जात आहेत. कापडाच्या किंमती उतरल्या आहेत व इतर मालाच्याहि लौकरच उतरतील. राष्ट्रीय आरोग्य योजनेमुळें सामान्य जनतेचा विशेष फायदा झाला आहे. मजूर पक्षानें केलेल्या सुधारणांमुळें राष्ट्रीय उत्पन्नाचा ४८ टक्के वांटा मजुरीवर खर्च होतो. पूर्वी हें प्रमाण फक्त ३९ टक्के होतें. भाडें, व्याज व नफा यांवर हल्लीं उत्पन्नाच्या २५ टक्के खर्च होतो. पूर्वी याचें प्रमाण ३४ टक्के होतें. उत्पन्नाच्या विभागणीच्या बाबतींत मजूर सरकारनें गेल्या सहा वर्षांत समता निर्माण करण्यासाठीं बऱ्याच गोष्टी केल्या आहेत हें वरील टक्केवारीवरून दिसून येईल. परंतु सामाजिक समता आणखी जास्त प्रमाणांत निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाईल. स्त्रिया व पुरुष यांचे पगारहि सारखे केले जातील. कायद्यानें डिव्हिडंड वांटण्यावर मर्यादा ठेवली जाईल. श्रीमंतांवर व अनार्जित उत्पन्नावर जास्त कर लादले जातील. गेल्या सहा वर्षांत १३ लाखांवर घरें बांधण्यांत आलीं आहेत. वर्षाला दोन लक्ष या प्रमाणांत नवीन घरें बांधलीं जातील व कच्चा माल इ. उपलब्ध होतांच हें प्रमाण वाढविण्यांत येईल.

युद्धोत्तर काळांतल्या अनेक आपत्तींना तोंड देऊन ब्रिटनमधील बहुसंख्याक लोकांचें जीवन व राहाणीचें मान सुधारण्याचा गेल्या सहा वर्षांत मजूर सरकारनें प्रयत्न केला आहे व या प्रयत्नांत त्याला यशहि आलें आहे. वृद्ध माणसांची जास्त काळजी घेतली जाते. प्रत्यक्ष राज्यपद्धतींत किंवा कारभारांत विकेंद्रीकरण साधण्यांत आलें आहे. तरुण पिढी सुखी व निरोगी आहे. मजूर सरकारचें मुख्य ध्येय ब्रिटनमध्यें शांतता राखणें, व आंतरराष्ट्रीय दृष्ट्या सहकार्य साधणें हें राहील. मजूर पक्षानें केलेल्या प्रत्यक्ष कामगिरीकडे लक्ष देण्याचें मतदारांना सांगण्यांत आलें आहे.

---

### अमेरिकन नियतकालिकांतील जाहिराती

१९५१ सालच्या पहिल्या सहामाहींत अमेरिकेंतील नियतकालिकांत २५ कोटी, ६ लक्ष डॉलर किंमतीच्या जाहिराती आल्या. १९५० च्या पहिल्या सहामाहींतील जाहिरातींचा खर्च २२ कोटी, ७८ लक्ष डॉलर होता.

---

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
ठेवी १ कोटीवर
हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.

---

### कोल्हापूर डि. सें. को. बँक लि.

गेल्या सालापासून ह्या बँकेस सर्व कोल्हापूर जिल्ह्याची एकच एक मध्यवर्ती को. बँक म्हणून मान्यता मिळाली आहे. कोल्हापूर जिल्ह्याच्या ११ तालुक्यांपैकीं तूर्त ४ तालुके कर्ज देण्यासाठीं बँकेकडे राखून ठेवले असून बाकीच्या ७ तालुक्यांसाठीं बॉंबे प्रॉ. को. बँकेची शाखा उघडण्यांत आली आहे. कर्जाव्यतिरिक्त इतर व्यवहार कोल्हापूर सें. बँकेकडेच आहेत. प्रांतिक बँक ह्या जिल्ह्यांत तीनच वर्षे रहाणार आहे. त्यासाठी भांडवल वाढवून जिल्ह्यांतील सर्व सोसायट्यांना कर्ज पुरविण्यास समर्थ होण्याचा कोल्हापूर सें. बँकेच्या चालकांचा कसून प्रयत्न चालू आहे. गेल्या सालीं वसूल शेअर भांडवल १,९४,९१५ रु. होतें, तें आतां २,३७,३५६ रु. झालें आहे. प्रांतिक बँकेची शाखा आल्यामुळें कांहीं मोठ्या संस्थांचीं खातीं तिचेकडे जाऊनहि बोर्डानें ४ लक्ष रुपयांची वाढ ठेवींत केली आहे. अहवालाचे वर्षी बँकेची जयसिंगपूर शाखा सुरू झाली. पन्हाळा, इचलकरंजी, कुरुंदवाड ह्या ठिकाणीं शाखा उघडण्यांत येणार आहेत. बँकेला २१,१११ रु. नफा होऊन ४% दरानें डिव्हिडंड वांटण्याचें ठरलें. बँकेच्या वाढत्या क्षेत्राचा तिला भरपूर फायदा मिळणार आहे. ( चेअरमन : व्ही. जी. सरनाईक, एम. ए., एल एल बी, ॲडव्होकेट. मॅनेजिंग डायरेक्टर : एन. टी. सरनाईक. )

---

### श्री महालक्ष्मी को. बँक लि., कोल्हापूर

वरील बँकेचें खपलेलें शेअरभांडवल ९९,०२० रु. असून रिझर्व्ह व इतर फंड ३२,७१९ रुपयांचे आहेत. ठेवींत थोडी वाढ होऊन त्या ९,५५,९७६ रु. झाल्या आहेत आणि एकूण ताळेबंद ११,१९,७६० रुपयांचा आहे. सालअखेर ३,२५,७९२ रु. कर्ज येणें असून थकबाकीचें प्रमाण १३% आहे. इनव्हेस्टमेंट फ्ल. फंडास १,००० रु. व एक्स्चेंज बँकेकडील येणें रकमेसाठीं १,००० रु. तरतूद करून १०,८९७ रु. निव्वळ नफा झाला आहे. ६ डिव्हिडंडला ५,९४७ रु. लागतील. बँकेनें चालविलेलें रेशन धान्य दुकान फायदेशीर चाललें आहे. बँकेनें सभासदांकरितां रिकरिंग डिपॉझिट खातें सुरू केलें आहे. लहान प्रमाणांत रकमा सेव्हिंग ठेवण्यासाठीं ह्या खात्याचा सभासदांनीं मोठ्या प्रमाणावर अवश्य फायदा घ्यावा. (चेअरमन : डॉ. ल. ज. कुलकर्णी, नागांवकर, एम. बी. बी. एस. मॅनेजर : नारायण गोविंद मुनीश्वर)

---

### महाराष्ट्र बँकेच्या सांगली–अमरावती शाखा

महाराष्ट्र बँकेची सांगली शाखा ११ ऑक्टोबर रोजीं व अमरावती शाखा १५ ऑक्टोबर रोजीं सुरू झाली. सांगली येथें डे. जिमखाना शाखेचे श्री. काळे हे एजंट म्हणून गेले असून गिरगांव शाखेचे श्री. प्रचंड हे अमरावती शाखेचे एजंट झाले आहेत.

---

### रेडिओवर श्री. मा. म. काळेकृत आर्थिक आढावा

"अर्थ"चे एक लेखक श्री. मा. म. काळे, एम. ए. ह्यांचें मुंबई रेडिओवर ता. २९ ऑक्टोबर रोजीं रात्रीं ८–३० वाजतां आर्थिक आढावा घेणारें भाषण होणार आहे.

**पनवेल तालुका सहकारी खरेदी–विक्री संघ लि., पनवेल**

अहवालाचे सालांत मागील सालप्रमाणें धान्यवांटपाचें काम पनवेल शहरांत व बाहेर गांवीं चालू आहे. शहराचे वाटपदुकानांत आणखी एका दुकानाची भर पडली आहे. आपटे, गव्हाण व तळोजें येथें कापडवांटप दुकानें सुरू केलीं आहेत. संघानें मंगलोरी कौलांचा व्यवहार सुरू केला असून त्यामुळें कौलांचा भाव दर हजारीं २०–२५ रुपये इतर व्यापाऱ्यांनीं कमी केला. वहातुकींची अडचण दूर करण्यासाठीं स्वतःचें वाहन घेण्याचा संघाचा विचार आहे. अहवालाचे वर्षीं संघास ८,८८६ रु. नफा झाला. त्यांतून ६¼% डिव्हिडंडला २,३२१ रु. लागले. (चेअरमन : गोविंद नारायण सोहोनी. मॅनेजर : द्वा. ना. लिखिते.)

---

**पेण तालुका सहकारी खरेदी–विक्री संघ लि., पेण**

सभासद १७९, वसूल भांडवल ५,०८० रु., एकूण व्यवहार ३,८७,७३४ रु., असे वार्षिक अहवालांतील प्रमुख आंकडे आहेत. संघाच्या धान्यवांटप केंद्रांतून लोखंड–पोलाद, सीमेंट, खावटी पड, खतें वगैरेंचेहि वांटप करण्यांत येतें. अहवालाचे वर्षीं, मागील कांहीं तफावतींची रकम वसूल करून आणि कांहीं रकमा बाद करून संघानें १९४९–५० च्या तोट्याऐवजीं आतां ३,०७८ रु. नफा मिळविला आहे. ६% डिव्हिडंडला ३१७ रु. लागतील. (चेअरमन : ग. ह. मनोहर, मॅनेजर. द. स. गुमास्ते.)

---

**दि कागल सें. को. बँक लि.**


अहवालाचे वर्षी संस्थेच्या खेळत्या भांडवलांत १२ हजार रु. आणि रिझर्व्ह व इतर फंडांत ११ हजार रु. वाढ झाली आहे. शेअर भांडवलहि वाढलें आहे. बँकेस निव्वळ नफा ५,०९० रु. आणि बँकेमार्फत चालविण्यांत येणाऱ्या धान्यदुकान व कापडदुकान ह्यांचा नफा ३,८६९ रु. मिळून ८,८६९ रु. नफा झाला आहे. ३,१८,११२ रु. खेळत्या भांडवलावर झालेला हा नफा समाधानकारक आहे. (प्रेसिडेंट : आर. एन. चौगुले. मॅनेजर : एल्. ए. शिंदे.)

---

**बँकेची नवी इमारत**—अहमदनगर डि. अर्बन सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेनें नवीन इमारत बांधली असून सेफ डिपॉझिट व्हॉल्टची व्यवस्था सुरू केली आहे. बँकेच्या नव्या इमारतीचा उद्घाटन समारंभ मुंबई राज्याचे मुख्य मंत्री ना. बाळासाहेब खेर ह्यांच्या हस्तें नुकताच झाला.

**तेलाच्या टंचाईचा परिणाम**—लाहोर ते डाक्का हा प्रवास करतांना ओरिएंटल एअरवेज कंपनीचीं विमानें तेल घेण्यासाठी भारतीय विमानतळावर उतरत असत. परंतु भारतामधील तेलाची टंचाई लक्षांत घेतां ही सोय ह्यापुढें होऊं शकणार नाहीं, असें भारत सरकारनें कंपनीला कळविलें आहे. त्यामुळें कंपनीचीं विमानें आतां वरील प्रवास एकाच दमांत करणार आहेत.

**जर्मन बोट कंपनीच्या फेऱ्या**—दुसरें महायुद्ध सुरू झाल्यावर भारत आणि जर्मनी ह्यांच्यामधील दर्यावर्दी वहातूक बंद झाली होती. सुप्रसिद्ध जर्मन बोट कंपनी 'हॅन्सा' ही आतां भारताशीं आपला दुवा पुनः जुळविणार आहे, असें समजतें. कंपनीच्या बोटी जर्मनीमधील ब्रेमन ह्या बंदरांतून निघून पर्शिअन आखाताच्या मार्गें कराचीला येत आहेत. आतां त्या मुंबईलाहि येणार आहेत. तूर्त दरवर्षी १२ फेऱ्या करण्याचा कंपनीचा विचार आहे.




फोनः ३४५१९ तारः SAHYOG

# दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

**९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.**

**उत्पादकांच्या (प्रोड्यूसर्स) सोसायट्यांना**

असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः–

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं, कातडीं कमाविण्यास लागणारा माल, कमावलेलें कातडें, इ., मशीन-टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः–

हातमागावरील कापड (सुती व लोकरी), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.